# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २०-०६-२०१२ रोजी (का.प.क्र. ४३)संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

बुधवार दिनांक दिनांक २०-०६-२०१२ (दिनांक ३०/०५/२०१२ ची पुढे ढकललेली) रोजी मा.महापौर सौ.अनिता नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.११.५५ वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला प्र.मा.आयुक्त श्री.कुणालकुमार ,भा.प्र.से.,नगरसचिव श्री.रविंद्र निकम तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे स. सदस्य उपस्थित होते.

१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष

२. स.स.श्री.विकास जैन

३. स.स.श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत

४. स.स.डॉ.खान जफर अहेमद

५. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव

६. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष

७. स.स.श्री.राजगौरव हरीदास वानखेडे

८. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद

९. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास

१०. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग

११. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल

१२. स.स.श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे

१३. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव

१४. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर

१५. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश

१६. स.स.श्री.भुईगळ अमित सुधाकर

१७. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु

१८. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल

१९. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव

२०. स.स.श्रीमती उर्मिला नितीन चित्ते

२१. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल

२२. स.स.श्री.बोराडे रामदास काशिनाथ

२३. स.स.श्री.घोडेले आनंद राधाकिसन
२४. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
२५. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
२६. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
२७. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
२८. स.स.श्री.इंगळे सुरेश सांडुजी
२९. स.स.श्री.खान जहांगिर अब्बास
३०. स.स.श्रीमती जरीना म.जावेद
३१. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान
३२. स.स.श्री.मिर्झा सलीम बेग मिर्झा हमीद बेग
३३. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
३४. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
३५. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
३६. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
३७. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
३८. स.स.श्रीमती कविता संजय जाधव
३९. स.स.श्रमती परविन खैसर खान
४०. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
४१. स.स श्री.अफसर खान यासीन खान
४२. स.स.श्री.फिरदोस फातेमा खान
४३. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
४४. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
४५. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल
४६. स.स.श्रीमती सय्यद मेहरुन्निसा खाजा
४७. स.स.श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
४८. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
४९. स.स.श्री.शेख हबीब शेख छोटु कुरैशी
५०. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
५१. स.स.श्री.खान आगा मिया खान
५२. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल

५३. स.स.श्री.नासेर खान अब्दुल रहेमान खान
५४. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर
५५. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे
५६. स.स.श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण
५७. स.स.श्री.मधुकर दामोधर सावंत
५८. स.स.श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
५९. स.स.श्रीमती शोभा पुखराज काळे
६०. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
६१. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव
६२. स.स.श्रीमती कला रविनंदन ओझा
६३. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
६४. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
६५. स.स.श्री.शिंदे सत्यभामा दामोदर
६६. स.स.श्री.निलाबाई देविदास जगताप
६७. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल
६८. स.स.श्रीमती घडमोडे सविता भगवान
६९. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
७०. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
७१. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
७२. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने
७३. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव
७४. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र
७५. स.स.श्री.खेडकर सुशिल तुकाराम
७६. स.स.श्री.निमगावकर प्रल्हाद गणपतराव
७७. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७८. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
७९. स.स.श्री.खान अक्रम करीम खान
८०. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
८१. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने
८२. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन

८३. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश

८४. स.स.श्री.गायकवाड रावसाहेब धोंडीराम

८५. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव

०२. स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद

०३. स.स.श्रीमती पाटील रेखा दिनकरराव

०४. स.स.श्री.अभिजित भास्करराव देशमुख

०५. स.स.श्रीमती हेमलता प्रकाश मुगदिया

श्री.रेणुकादास वैद्य : निरा नदीच्या पुलावर ज्ञानेश्वर माऊलीच्या दिंदीमधील भावीकांचा अपघात होवून ९ वारकरी मृत्युमुख्ी पडले त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.संजय जोशी :हा अपघात दुर्दैवी आहे अनेक वारकरी जेंव्हा पंढरपूरला जातात हा रस्ता लहान असल्यामूळे असे अपघात होतात तो रस्ता चौपदरी व्हावा यासाठी सभागृहाच्या भावना राज्य शासनास कळवाव्या जो श्रध्दाजंली अर्पण करण्यास अनुमोदन आहे

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

या वेळी सदर अपघातात मृत्यू झालेल्या भावीकांना सभागृहाच्या वतीने ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

मा.महापौर :नुकतेच स्थायी समिती व विविध ५ विषय समित्यावर,महिला व बाल कल्याण समितीवर उपसभापती पदी व प्रभाग समिती अ ते ई साठी सभापती पदावर निवड झालेले तसेच सभागृह नेता पदी श्री. रेणूकादास दत्तोपंत वैद्य यांची निवड झाली या सर्वांचे मी पुष्पगुच्छ देवून अभिनंदन करते.तसेच महानगरपालिकेचे प्र.आयुक्त जे सध्या जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असलेले मा.श्री. कुणालकुमार यांनी त्यांचेकडे जिल्हाधिकारी म्हणून अतिशय कामाचा व्याप असतांना त्यांनी महानगरपालिकेत अतिशय चांगल्या पध्दतीने मनपा आयुक्त म्हणून अतिरिक्त पदाचा कार्यभार सांभाळलेला आहे व त्यांनी त्यांचे कार्यकाळात महत्वाच्या योजना व चांगल्या प्रकारची कामे करण्याचा प्रयत्न केलेला असल्याने त्यांचे या सभागृहात सत्कार करण्यात येतो.

या वेळी स्थायी समितीचे मा.सभापती तसेच विषय समित्यांचे ५ सभापती तसेच महिला व बाल कल्याण उपसभापती व वार्ड समित्यांचे ६ सभापती व सभागृह नेता पदी निवड झालेल्यांचे मा.महापौर यांनी पुष्पगुच्छ देवून अभिनंदन केले.तसेच मा.जिल्हाधिकारी तथा मनपाचे प्र. आयुक्त श्री. कुणालकुमार यांचाही मा.महापौर यांनी चांगले काम केल्याबध्दल पुष्पगुच्छ देवून सत्कार करतात.

**चर्चा :-**

श्री.अफसर खॉन :पावसाळा सुरू झाला नाला सफाईचे काम अदयाप सुरू का झाले नाही.

श्री.संजय जोशी :आदरणीय मा.महापौर यांनी त्यांचे दालनात दोन दिवसापूर्वी बैठक आयोजित केली होती त्या बैठकीत काही अधिकारी यांनी गैरवर्तन केले असे वर्तमानपत्रातून वाचले ते अधिकारी आज सुध्दा सभागृहात दिसून येत नाही त्यांची सुट्टी मंजूर केली का , का आले नाहीत खुलासा होणे गरजेचे आहे स.पदाधिकारी यांचा अवमान होत असेल तर सामान्य नगरसेवकांना बैठकीला जाण्याची भिती वाटायला लागली स. पदाधिकारी यांचा अपमान म्हणजे सर्व सभागृहाचा अपमान आहे खुलासा व्हावा.

मा.महापौर :नाले सफाई का पुर्ण केली नाही खुलासा करावा.

श्री.त्रिंबक तुपे :आताच नाले सफाईचा विषय मांडला आणि गेल्या १५ दिवसापूर्वी नाले सफाईचे काम हाती घेण्यात आले असे वाटले हे काम होत असतांना मा.आयुक्त, मा.सभापती मा.महापौर व इतर सर्वच स.पदाधिकारी यांनी नाल्याची स्थळ पाहणी केली  दरवर्षी नाले साफसफाई करण्याचे ठरवितो त्यासाठी पैसा खर्च करतो मा.आयुक्तांनीही पाहणी केली नाल्याची सफाई कशा पध्दतीने केली पाहिजे हे त्यांचे लक्षात आले असेल. नुकताच पावसाळा आला म्हणजे एका नाल्याची १०-१० भाग करून त्यावर लाखो रूपये खर्च करतो. आणि नुसता काही यंत्रणाच्या माध्यमातून वरचा कचरा जमा केला जातो व तो कचरा बाजूला टाकला जातो व संबधीत साफसफाईचे काम घेणारे ठेकेदार पावसाची वाट पाहतो जे की बाजूला टाकलेला कचरा परस्पर वाहून जाईल.आता कचरा वाढलेला आहे अपेक्षा केली होती नाल्याची साफसफाई होत असतांना पाऊस येईल व कचराही वाहून जाईल परंतु अनेक भागात पाऊस पडल्यानंतर अनेकांच्या घरामध्ये पाणी गेले.म्हणजे देखावा म्हणून नाले सफाई होत असेल तर महापालिकेच्या हिताचे नाही.मग जे कुणी अधिकारी सभांमध्ये उपस्थित झालेत व स.महापौर, इतर सर्व पदाधिकारी उपस्थित असेल व तेथे अधिका-यांकडून व्यवस्थित उत्तर दिले जात नसेल तर स.पदाधिकारी यांचा अवमान केला जात असेल तर ही बाब चुकीची आहे.स.पदाधिकारी हे शहरातील विकास व नागरीकांना सुविधा कशा मिळतील हे प्रयत्न करीत असतात. ज्या ज्या ठिकाणी आपण पाहणी केली त्या ठिकाणी नाल्याची कामे चालू आहे जेथे पाहणी केली नाही तेथील नाल्याच्या सफाईच्या कामास सुरूवात झाली नाही.आपण बघीतले असेल अनेकदा नाले सफाईचे काम चांगले होत नाही म्हणून अशा बाबतीत स.पदाधिकारी यांनी बैठक बोलवून माहिती विचारली तर त्यांचे उत्तर अधिकारी यांनी सुध्दा चांगल्या पध्दतीने दिले पाहिजे.स.पदाधिकारी यांचेशी चांगले वागले पाहिजे स.पदाधिकारी मा.महापौर असतील यांनी बैठक बोलवली तर अधिकारी यांनी त्यांचा मान सन्मान राखलाच पाहिजे.जर कुणी जाणीव पुर्वक काम केले नाही तर अशा अधिकारी यांचेवर कार्यवाही झालीच पाहिजे.मा.महापौरानी महापालिकेच्या हितासाठी बैठक आयोजित केली

होती. अनेक ठिकाणी बांधकाम होतात त्या बाधकांमाचा मलवा भरती ही नाल्यात टाकली जाते.म्हणून जी नाल्याची हद्द असेल जेवढा नाला रूंद असेल तेंवढा करावा.त्यामूळे अतिक्रमण होणार नाही अनेक नाल्यामध्ये अतिक्रमण झाले सिव्हरेज ,ड्रेनेज लाईनचे पाणी नाल्यातून वाहते त्या दुरूस्त करण्यासाठी शासनाकडे निधीची मागणी करण्याची गरज आहे.पावसाळयामध्ये उघडयावर असे पाणी वाहत असेल तर रोगराई पसरेल.म्हणून ज्या अधिका-यांचे ते काम आहे त्यांनी ते काम केले पाहिजे स.पदाधिकारी यांचे समोर जाऊन वेगळी भुमिका मांडण्याचे काम त्यांनी करू नये.नालेसफाईचे काम अतिशय चांगले व तातडीने व्हावे.

श्री.संजय जोशी :परवाच्या दिवशी आरोग्य सभापती यांनी बैठक आयोजित केली होती त्या बैठकीला सर्व आरोग्य अधिकारी उपस्थित होते.मुख्य जे आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे त्यावेळी त्यांचे कॅबीनमध्ये बसलेल्या होत्या ते बैठकीला का आले नाही.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.अफसर खॉन :जर अधिकारी असे करीत असेल तर त्यांचा पदभार काढून घ्यावा.

श्री.संजय जोशी :कालच्या बैठकीमध्ये पदभार काढायचा म्हणून स.पदाधिकारी गेले होते का काढला नाही.

श्री.महेश माळवतकर :जे १० लक्ष लोकसंख्येचे आरोग्य प्रमुख आहे जर ते आपला अपमान करतात त्यांना मा.महापौरांचा मानसन्मान कसा ठेवायचा हे जर माहित नसेल तर त्यांनी सेवा करू नये.

श्री.रेणुकादास वैद्य :सर्व स.सदस्यांच्या भावना आपण ऐकल्या सर्वाचे माझ्या मते एकच मत असेल अशा अधिका-यावर कडक कार्यवाही केली पाहिजे.या अधिका-यांच्या संदर्भात यांचेवर शोकास नोटीसची संख्या तर हजारोच्या वर असेल त्यांचे निलंबन माझ्या मते १०० वेळेस झाले असेल टर्मीनेटची कार्यवाही सुध्दा आपल्या समोर आली किंवा आली असेल सर्वांची हीच मागणी असेल अशा प्रकारच्या अधिका-यांना आपण का म्हणून पाठीशी घालतो आहोत.त्यांचेकडे आरोग्य वैद्यकीय अधिकारी तसेच घनकचरा व्यवस्थापन पदाचा चार्ज आहे गेल्या पाच वर्षात दोन्ही विषयामध्ये त्यांचेकडून समाधानकारक काम झाल्याचे दिसून येत नाही.सभागृहाची भावना हीच आहे की अनेक ठिकाणी कच-याचे ढिग दिवसात अनेकदा आम्ही फोन करतो तो उचलला जात नाही उचलला तरी मी बैठकीत आहे महत्वाची बैठक आहे असे सांगितले जाते मा.आयुक्त किवा कोणतेही विभाग प्रमुख अशा प्रकारची अवहेलना करीत नाही.परंतु या अधिका-याकडून नगरसेवकांना नागरीकांना अशा प्रकारची वागणूक वारंवार मिळत असते तसेच त्या विभागातील कर्मचा-यांचे एक निवेदन आपल्यापर्यंत प्राप्त झाले त्यांची मागणी अशी आहे की या अधिका-याबरोबर आमची मानसिकता बिघडण्याची वेळ आली आहे.अतिशय बारीक सारीक गोष्टीमध्ये कर्मचा-यांना वेठीस धरणे

त्यांचे संचिकेवर चौकशी लावणे अनेक विषयामध्ये जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे जाणीवपुर्वक त्रास देणे अशा पध्दतीने काम करणे अशा पध्दतीची कार्यशैली आहे परवाच्या बैठकीमध्ये मा.महापौर आपणां बरोबर जो प्रकार घडला तेथे काही अधिकारी सुध्दा होते त्याचे मत सुध्दा मा.आयुक्त यांनी जाणून घ्यावे.आणि या विषयामध्ये अशा अधिका-यांना पाठीशी घालणेचे कारण नाही माझ्या मते प्रशासनाचे सर्व अधिका-याचे व सभागृहाचे हेच मत असेल कुठली भिडभाड न करता अतिशय कठोर कार्यवाही आजच्या आज प्रस्तावित करावी व त्याची अमलबजावणी करावी.

श्रीमती प्रिती तोतला :घनकचरा कक्ष प्रमुख यांना कचरा बाबत सांगितले तर मी वार्ड अधिकारी यांना पाठविते त्यांना सांगते असे उत्तर मिळते त्यांना मी बारूदगर नाल्यावर पाहणी साठी बोलविले होते त्यांनी असे म्हटले की मी येत नाही आपण मिडीयांना बोलवून माझा अपमान करतात.ज्या अधिका-यांना स्वत: चा अपमान होण्याची भिती वाटते त्यांना दुस-यांचा अपमान करण्याचा अधिकार नाही त्या पदावर काम करण्याची त्याची तयारी नाही त्यांचेकडून पदभार काढण्यात यावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :घनकचरा व्यवस्थापन अधिकारी यांचे बध्दल सभागृहात चर्चा होते तीन महिण्यापासून शहरामध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले ते जनतेच्या अत्यंत जिव्हाळयाचे आहे पाणी प्रश्न शहरात बिकट आहे.मा.महापौर दालनात बैठक असतांना जो काही प्रकार घडला त्याची वस्तुस्थिती आमच्या पर्यंत आली नसली तरी वेगवेगळया दैनिकाच्या माध्यमातून ते आम्ही वाचलेले आहे.कोणत्याही स.पदाधिकारी यांचा अधिकारी यांनी अवमान करू नये उध्दटपणे वागू नये आजचे काम उदया होईल. कामात अडीअडचणी येत असेल तर मा.आयुक्ताच्या आदेशानुसार निश्चितपणे मार्ग काढता येईल.

श्री.अफसर खॉन :मा.महापौरांचा अवमान होत असेल तर योग्य नाही मा.महापौराच्या पाठीशी आम्ही आहोत कार्यवाही करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :कार्यवाही करण्याचे थांबवू नये त्यावर दुसरा अधिकारी नियुक्त करावा ते सक्षमपणे काम करेल.

श्री.काशिनाथ कोकाटे :आताच म्हटल्याप्रमाणे कार्यवाही होईल परंतु कार्यवाहीची माहिती घेण्याचा अधिकार आम्हाला आहे.आमच्या वार्डात तीन दिवसापासून पाणी नाही. मा.महापौर व स.पदाधिकारी याचा आम्ही आदर करतो काय प्रकार झाला आम्हाला माहिती दयावी

श्री.मीर हिदायत अली :मा.महापौरांचा अपमान काय झाला सभागृहाला माहिती व्हावी.

मा.महापौर :सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता महापौर पद हे सर्वोच्च पद आहे महापौरांचा मान सर्वच राखतात आणि राखला गेला पाहिजेत अशी माझी स्वत:ची भावना आहे.आणि प्र.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी दोन दिवसापुर्वी सर्व मर्यादा ओलांडून महापौर या नात्याने जे माझ्याशी वर्तन केले म्हणजे महापौर

पदाचा त्यांनी अवमानच केला असून असे वर्तन करणे हे त्यांना अशोभनीय असून त्यांना शिक्षा म्हणून त्यांचेकडे असलेला प्र.आरोग्य वैद्यकीय अधिकारी व घनकचरा व्यवस्थापन पदाचा पदभार काढण्याचे हे सभागृह प्रशासनाला आदेशीत करीत आहे त्याची प्रशासनाने तात्काळ अमलबजावणी करून अहवाल सादर करावा.

श्री.मीर हिदायत अली :आरसीएच ठराव स्थगित केला होता संध्याकाळी त्या कर्मचा-याकडून पैसे जमा करण्यात आले. नंतर मंजूर म्हणून शासनाकडे पाठविले यात मा.महापौर आपला अपमान झाला नाही का ?अहवाल देणार होते २ महिने झाले.

श्री.संजय केनेकर : आरोग्य वैद्य.अधिकारी यांचे बाबतीत निर्णय धेतला तो योग्य आहे प्रशासनाने अशा अधिका-या विषयी निर्णय घ्यायला पाहिजे होता आरोग्य सभापती स.पदाधिकारी यांचा अवमान अर्थात सभागृहाचा अवमान आरोग्य अधिकारी , आरोग्य सभापती यांना माहिती देत नाही हा आमचा अपमानच आहे.

श्री.बाळासाहेब मुंडे :नाल्याची मार्कींग करावी नालेच्या नाल्या झाल्या रूंदी वाढवावी अतिक्रमण काढावे.साफसफाई करावी.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :माझ्या वार्डातील नाल्याची साफसफाई अर्धवट झाली ७५टक्के नाले स्वच्छ झाले नाही गारखेडा जवाहर कॉलनी भागात नाल्याची संख्या जास्त असून पुर्णत: नाल्यात पाणी तुबंले.

श्री.संजय केनेकर :गारखेडा परीसर व इतर बाजूच्या माझ्या वार्डातून नाला जातो या नाल्यावर जवळपास २५ हजार लोकवस्ती ,परंतु १५-२० वर्षापासून या नाल्याची व्यवस्थीत साफसफाई होत नाही नाला अरूंद होत चालले .अे-१ बी-१ रेटलिस्ट प्रमाणे अंदाजपत्रक होते टेंडर काढले जाते मोठा खर्च होतो परंतु नाले साफ होत नाही याकडे लक्ष देण्याची गरज ,प्रशासनाने या सर्व नाल्याची ,झालेल्या कामाची पाहणी करावी.मनपाचे अधिकारी ठेकेदाराकडून काम करून घेत नाही नियोजनाचा अभाव आहे साईटवर कुणी जात नाही.झालेल्या कामाची चौकशी व्हायला पाहिजे.

श्री.अफसर खॉन :अे-१ बी-१ प्रमाणे कामे केली जातात १०० ोटी खर्च होतात काम होत नाही आता स.सभापती यांनी प्रत्येक वार्डसाठी ५ लक्ष रू केले त्यांचे अभिनंदन, १० लक्ष करायला पाहिजे १० कोटी होतात.

श्री.प्रमोद राठोड :नाला सफाईचे टेंडर दिले जाते साफसफाई होत नाही मा.आयुक्त यांनी आढावा घेतला माझ्या वार्डातून अग्रेसन भवनकडून नाला येतो त्यात ड्रेनेजचे पाणी सोडले नागरीकांना मोठा त्रास सहन करावा लागतो अधिकारी यांना सुचना केली वार्ड ई मध्ये येतो नाला हा ब वार्ड मध्ये आहे अशी उत्तरे दिली जातात.वार्ड ई अधिकारी ब च्या अधिका-यांना बोलवून सुचना देवू शकतात परंतु तसे होत नाही.

श्रीमती किर्ती शिंदे :१-२ महिण्यात पुर्ण नाले साफसफाई होत नाही वर्षभर हे काम चालू ठेवावे कर्मचारी यांना त्या प्रमाणे साहित्य देण्यात यावे.

| | |
|---|---|
| श्री.महेश माळवतकर | :सिडको एन-७ आंबेडकर नगरपासून सप्तपदी मंगल कार्यालय ते एस पी यांच्या बंगल्यापासून नाला वाहतो तेथे सध्या काम चालू आहे नाल्याचे पात्र अरूंद झाले असून त्या नाल्याची संरक्षीत भित मोडकळीस आली ती मुख्य नाल्यात पडण्याची शक्यता आहे.तसे झाल्यास यानंतरच्या पावसाचे पाणी लोकांच्या घरात जावू शकते जे आवाहन केले त्यानुसार नाल्याच्या बाजूला झालेले अतिक्रमण ते कोणाचेही असो ते आजच काढले जावे. नाल्याच्या दोनही बाजूची जागा कुणाची नाही सिडकोने लगत पर्यत ऑड शिप्टची जागा विकली अहवाल मागवावा चार महिणे सतत नाल्याची साफसफाई व्हावी सफाईचे काम पुर्णत: होत नाही नाल्याच्या बाजूला आरसीसी भिंती असाव्यात.नाल्यावर पुर्ण हक्क हा महापालिकेचा शासनाचा असायला पाहिजे. साफसफाई बाबत टेंडर काढले नाला रूंद करावे त्यानंतर कार्यवाही करावी. |
| श्री.संजय जोशी | :एखादा नाला सी.सर्वे मधून २५ मीटर असेल तर बिल्डर काम करतांना तो नाला २ मीटर दाखवतात.सिटी सर्वे विभागाला आदेशीत करावे की नाल्याची साईट आहे तशीच असायला पाहिजे. |
| श्री.संजय केनेकर | :सिटी सर्वे नुसार मॅप प्रमाणे कार्यवाही करावी नाले रूंद करावे सलीम अली सरोवर भागात मोठया प्रमाणात अतिक्रमण झाले. |
| श्रीमती अशाबाई मोरे | :वार्ड ९७ मध्ये गेल्या वर्षी नाला साफसफाई व्यवस्थित झाली नाही पुरस्थिती निर्माण झाली लोकांच्या घरात पाणी गेले तीच समस्या या वर्षी निर्माण होऊ शकते. |
| प्र.मा.आयुक्त | :नालेचा प्रश्न वेगळया पध्दतीने हाताळणे व या बाबतीत कायमचे तोडगा काढणे आवश्यक आहे.ज्या वर्षी पाऊस जास्त होतो त्यावेळी सर्वांना अडचणीस सामोरे जावे लागते.नाल्याचे पाणी म्हणजे मुलभूत प्रश्न हा ड्रेनेजशी सबधीत .१५०-२०० एमएलडी पाणी शहरात येत असेल तर त्यापैकी ८० टक्के पाणी हे ड्रेनेजच्या माध्यमातून वाहत असते.आज ड्रेनेज सिस्टम नसल्यामूळे ते पाणी नाल्यामध्ये कन्वर्ट होते तेच पाणी नदीमध्ये जाते नाल्याचे रेखांकन होणेसाठी सीटी सर्वे अधिकारी यांचे सोबत बैठक घेतली काम ऑलरेडी सुरू करण्यात आले शहरातील सर्व नाल्याची मोजणी काही दिवसात होईल त्यानंतर नालेची नेमकी साईट किती त्यानुसार हद्द निश्चित होईल झालेले अतिक्रमण केलेल्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यासाठी MRTP ॲक्ट ५२,५३ नुसार व महापालिकेचे अधिनियम ४७१ कलम नुसार कार्यवाही करावी लागणार पहिल्यांदा ड्रेनेज लाईनची सिस्टीम सुधारावी लागणार,आता जे टेंडर काढून काम केले जाते त्याचा निधी कधी कधी वेळेवर उपलब्ध होत नाही टेक्नीकल अडचण मशीनरी नाल्यात उतरत नाही.नाल्याची जागेची मोजणी ,सिमा निश्चित केल्यास त्यानंतर अतिक्रमण काढणे ड्रेनेज लाईन टाकणे गाळ काढणे अशा पध्दतीने काम केल्यास नाल्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटेल.नाले साफसफाईचे काम सुरू केले जेथे साफसफाई होत नसेल तर तसे माझ्याकडे त्या वार्डाचे स.सदस्यांनी |

एसएमएस द्वारे कळविले तर तेथे कर्मचारी पाठवून कार्यवाही केली जाईल दुसरा प्रश्न कच-याची विल्हेवाट न होणे शास्त्रोक्त पध्दतीने कच-याची विल्हेवाट करण्यासाठी अनेक अडचणी आहेत.सॉलीडमेन्ट मॅनेजमेन्ट जी गव्हरमेंन्ट ऑफ इंडिया ची पुस्तीका त्यात १००० लोकसंख्ये मागे ५ स्वीपींग स्टॉफ असला पाहिजे जे मानक दिले त्यानुसार ६ हजार मॅनपावरची आवश्यक पडते परंतु ते नाही कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी शास्त्रोक्त पध्दतीने एखादी एजन्सी पाहिजे किंवा ठेका दयावा लागेल अनेक नागरीक कचरा टाकतांना तो नाल्यात जातो नाल्यातील कचरा बाहेर काढल्यानंतर तो पुन्हा पाऊस आल्यानंतर नाल्यात जातो त्यासाठी आताच म्हटल्याप्रमाणे या उपायोजना करण्याची गरज आहे.

श्री.अफसर खॅान :माझ्या वार्डात मस्जीद जवळ ड्रेनेज लाईन चोकअप झाले श्री.एम एम खॅान अभियंता यांना अनेकदा सुचना करून काम केले नाही पाणी रिटन येत आहे.अधिकारी काम करीत नाही त्यांची बदली करावी

श्रीमती प्रिती तोतला :औषधी भवन येथील नाल्याची शहर अभियंता यांनी पाहणी केली श्री.गायकवाड यांना नाला साफ करण्या बाबत सुचना केल्या होत्या कोणती टीम तेथे कार्यवाही साठी आले नाही.

श्री.खाजा शरफोद्यीन :माझ्या वार्डात लाईन फुटली माहिती दिली असता बजेट नाही असे सांगण्यात येते दलीत वसाहतीत आहे लोक आजारी पडतात दवाखा-यात ॲडमिट आहे कार्यवाही होत नाही.

कार्य.अभियंता(ड्रेनेज) :स.सदस्य श्री. अफसर खॅान यांनी जो मुद्या मांडला तेथे मी पाहणी केली.

श्री.अफसर खॅान :३ मस्जीद येतात ड्रेनेजचे पाणी बाजूला रिवर्ट होते फोन करून सांगितले श्री. पानझडे यांना बोललो श्री. एम एम खान यांना सांगितले त्यांनी काम केले नाही किरकोळ काम होत नसेल तर अशा अधिका-यांची बदली करावी.

कार्य.अभियंता(ड्रेनेज) :सकाळी जाऊन पाहणी करून प्रश्न सोडविण्यात येईल स.श्री. खाजा शफोद्यीन यांचे वार्डातील कामाचे २५ लक्ष अंदाजपत्रक तयार केले सर्वसाधारण सभेचे मनपाच्या फंडातून काम करू नये असे म्हटले त्यामूळे ते काम करता आले नाही. देखभाल दुरूस्तीचे काम असेल तर करता येईल

श्री.काशिनाथ कोकाटे :पाणी पुरवठयाचा विषय होता सभेत कामकाज नुसार ठराव करतांना मनपा फंडातून काम करण्यात येवू नये असे म्हटले परंतु इतर जसे काम केले जात आहे त्या प्रमाणे निधी उपलब्ध करून स.सदस्य श्री. खाजा शरफोद्यीन यांचे वार्डातील पाणीपुरवठयाचा प्रश्न सोडवावा.

मा.महापौर :सभा संपल्यानंतर संबधीत अधिकारी यांनी माझ्या दालनात यावे या संबधी चर्चा करून योग्य निर्णय घेवू.

श्री.मिर हिदायत अली :औषधी भवन येथे पावसाच्या पाण्यामूळे नाला तुडूंब भरता होता नाल्यावरील सुपर मार्केट जवळ मोठी इमारत होत आहे मा.न्यायालयाने

सुध्दा नाल्यावरील इमारतीची स्लॅबची उंची कमी आहे असे म्हटले त्याप्रमाणे इमारत होत आहे की नाही .

श्रीमती किर्ती शिंदे : अंगुरीबाग येथे गटारीचे काम होत नाही गटारीमधून पाणी मोठया प्रमाणात वाहते.

श्रीमती रेखा जैस्वाल :माझ्रा वार्डात काही भाग भौगोलिक दृष्टी उंच नाही त्यामूळे पावसाळयांत अनेक लोकांच्या घरात नाल्याचे पाणी जाते दीड वर्ष झाले ठेकेदार काम करीत नाही साफसफाई सतत चालू ठेवावी जेथे ढापे बसत नाही तेथे स्लॅब टाकावा

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांनी पाहणी करून तीन दिवसात अहवाल सादर करावा.

श्री.गिरजाराम हळनोर :८ वी ते १० वर्गात शिक्षण घेणा-या मुलांना शिक्षक असावे तसेच ज्या शिक्षकांची शिक्षक सेवेक म्हणून नियुक्ती केली होती त्यांचा परिविक्षाधिन कालावधी खुला करण्यात यावा.

श्री.संजय केनेकर :दैनिक वेतन कर्मचारी यांना मुदत वाढ दयावी.

श्री.मीर हिदायत अली :आरसीएच कर्मचारी यांचा प्रस्ताव स्थगित केला नंतर महापौर दालनात जाऊन त्यास मंजूरी देवून शासनाकडे त्यांना कायमस्वरूपी करण्यासाठी प्रस्ताव पाठविला त्याच बरोबर जे दैनिक वेतन कर्मचारी आहे जे १५-२० वर्षापासून साफसफाईचे काम करतात त्यांचा प्रस्ताव का दिला नाही.

मा.महापौर :सभागृहात निर्णय घेतला होता त्याप्रमाणे कार्यवाही केली.

श्री.संजय केनेकर :आताच स.सदस्य श्री.मीर हिदायत अली यांनी जो प्रश्न माडंला तो विषय तसा मंजूर करून पाठविता येत नाही त्यास आमचा सर्वांचा विरोध आहे.

मा.उपमहापौर :शासनास जो प्रस्ताव पाठविला आहे आरसीएच संदर्भात त्यात आमचा विरोध नोंदवून घ्यावा.

**विषय क्रमांक ७६२ :-**

दिनांक १८.१०.२०११रोजी (कार्यक्रम पत्रिका क्रमांक २८) व दिनांक.१८.१०.२०११ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक २९) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

मा.महापौर : मंजूर

**ठराव :-**

दिनांक १८.१०.२०११रोजी (कार्यक्रम पत्रिका क्रमांक २८) व दिनांक.१८.१०.२०११ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक २९) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक : ७६३:-**

मा.आयुक्त यांच्या मान्यतेनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रस्ता रूंदीकरण मोहिम यशस्वी करण्यासाठी तसेच दिनांक २५/०४/२०१२ रोजी दुपारी ०१.१० वा. शहागंज भाजी मार्केट येथील धोकादायक बनलेले व्यापारी संकुल निष्काशित करीत असतांना श्री.पदमाकर भिमराव ढमाले (खाजगी सुरक्षा रक्षक मॅस्को) यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालुन पाच लोकांचे प्राण वाचवलेले आहेत. तसेच मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेही प्राण

त्यांच्यामुळेच वाचलेले आहेत. यानंतर दुस-या एका व्यक्तीचे प्राण वाचवित असतांना त्यांच्या स्वतःच्या पायावर स्लॅप कोसळुन पायाचा तुकडा पडलेला आहे. पायावर शस्त्रक्रिया व औषधी उपचार करण्यासाठी रूपये १,००,०००/- आर्थिक मदत देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :-**

| | |
|---|---|
| श्री.रेणुकादास वैद्य | :नियमानुसार प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. |
| श्री.महेश माळवतकर | :या श्री.ढमाले हे खाजगी सुरक्षा रक्षक आहे त्यांनी स्वतःचा जीव धोक्यात टाकून अग्निशमन अधिकारी यांचे प्राण वाचविले त्याचा यात पाय बेकामी झाला आता त्यांना इतर खाजगी ठिकाणी नोकरी मिळणार नाही त्यामूळे त्यांना प्रस्तावानुसार १ लक्ष रक्क्म तर दयावीत परंतु या महापालिकेत त्यांना दैनिक वेतनावर घेता येत असेल तर आवश्यक कार्यवाही करावी. |
| डॉ. जफर खॉन | :ही घटना शहागंज भाजी मंडई येथे घडली त्या ठिकाणी कार्यवाही करीत असतांना तेथील दुकानदार यांना पर्यायी व्यवस्था करून देणार होतो त्या बाबतीत काय कार्यवाही केली. |
| मालमत्ता अधिकारी | :त्या लोकांना प्राधान्याने जागा देण्यात येईल |
| मा.उपमहापौर | :काही दुकानदार यांनी मा.कोर्टात दाद मागितली त्यावर मा.न्यायालयाने या जागेवर महापालिकेचे काय नियोजन आहे होते विचारणा केली विधी सल्लागार यांनी ३ तारखेपासून अदयाप माहिती सादर केली नाही विधी विभाग व संबधीत विभाग यांचा समन्वय नसल्यामूळे मधला कालावधी गेला. |
| मालमत्ता अधिकारी | :जे शॉपींग सेन्टर पाडण्यात येत आहे व तेथे नव्याने बांधकाम करण्यासाठी त्याचे नकाशे वगैरे तयार करण्याचे काम शहर अभियंता व संबधीत विभागाचे आहे. |
| श्री.संजय जोशी | :या मा. आयुक्ताकडे प्र. चार्ज आहे पुर्वी जे मा. आयुक्त होते त्यांनी हे पाडण्याची आदेशीत केले होते का ते आयुक्त आल्यानंतर माहिती घ्यावी. |
| मा.महापौर | :रेग्यूलर मा.आयुक्त आल्यानंतर या संबधी सर्व स. पदाधिकारी एकत्रित येवून चर्चा करून निर्णय घेतला जाईल. |
| श्री. प्रमोद राठोड | :प्रस्ताव पारीत केल्यानुसार त्या ठिकाणी पुर्व तयारी केली होती का ? |
| डॉ.जफर खान | :संबधीत दुकानदार यांना पर्यायी जागा देण्यात यावी. |
| मालमत्ता अधिकारी | :तसा नवीन प्रस्ताव व त्या ठिकाणी करण्यात येणारे बांधकाम बाबत शहर अभियंता यांचे संबधीत आहे. |
| मा.महापौर | :नियमानुसार आर्थीक मदत देण्यास प्रशासनाने कार्यवाही करावी. |

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रस्ता रूंदीकरण मोहिम यशस्वी करण्यासाठी शहागंज भाजी मार्केट येथील धोकादायक बनलेले व्यापारी संकुल निष्काशित करीत असतांना श्री.पदमाकर भिमराव ढमाले (खाजगी सुरक्षा रक्षक मॅस्को) यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालुन त्यांच्या स्वतःच्या पायावर स्लॅप कोसळुन पायाचा तुकडा पडल्याने पायावर शस्त्रक्रिया व औषधी

उपचार करण्यासाठी रूपये १,००,०००/- आर्थिक मदत देण्यासाठी प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७६४:-**

सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेनुसार जिल्हाधिकारी कार्यालय चौक ते चेलीपुरा ते शहागंज चमन विकास योजना या रस्त्यामध्ये दोन्ही बाजुस नव्याने जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामाचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन २०११-२०१२ आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) दरसुची नुसार रक्कम रूपये ५८,७०,३९७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन त्यास मा.सर्वसाधारण सभा दिनांक २०.०४.२०१२ विषय क्रमांक ७१६ अन्वये मान्यता प्राप्त आहे.

सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या.त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

१. उदय इंजिनिअरींग वर्क्स - अंदाजपत्रका पेक्षा ३६ % जास्त
२. श्री.अ.कदीर शे.रहीम - अंदाजपत्रका पेक्षा ४५ % जास्त

तुलनात्मकदृष्टा सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रका पेक्षा ३६% जास्त दराची उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची निविदा आहे. सदर जलनि:सारण वाहिनीचे काम पावसाळयापूर्वी करणे आवश्यक असल्यामुळे दराचे वाटाघाटीसाठी कंत्राटदार यांना बोलविले असता वाटाघाटीअंती त्यांनी दर कमी करून ३१ % जास्त दराने काम करण्यास संमती दिली आहे.

करीता उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची दराचे वाटाघाटीनुसार ३६ % जास्त ऐवजी ३१% जास्त दराची निविदा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :- वरील विषय क्र. ७६४ ते ७६८ हे विषय स्थायी समितीकडे वर्ग करण्यात येते.

**ठराव :-**

प्रस्तुत विषय क्र. ७६४ ते ७६८ हे विषय स्थायी समितीकडे वर्ग करण्यास मंजुरी देण्यात आली.

**विषय क्रमांक ७६५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेनुसार औरंगाबाद महापालिका मुख्यालय ते चेलीपुरा पर्यंत मार्गे लोटाकारंजा विकास योजना या रस्त्यामध्ये दोन्ही बाजुस नव्याने जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामाचे महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाची सन २०११-२०१२ आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC)दरसुची नुसार रक्कम रूपये ६२,१२,३४०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन त्यास मा.सर्वसाधारण सभा दिनांक २०.०४.२०१२ विषय क्रमांक ७१८ अन्वये मान्यता प्राप्त आहे.

सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या.त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

१. श्री.एस.एम.इब्राहीम - अंदाजपत्रका पेक्षा ३३.२१ % जास्त
२. मे.नाज डेव्हलपर्स - अंदाजपत्रका पेक्षा ३८.३८ % जास्त

तुलनात्मकदृष्टा सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रका पेक्षा ३३.२१ % जास्त दराची श्री.एस.एम.इब्राहीम यांची निविदा आहे. सदर जलनि:सारण वाहिनीचे काम पावसाळयापूर्वी करणे आवश्यक असल्यामुळे दराचे वाटाघाटीसाठी कंत्राटदार यांना बोलविले असता वाटाघाटीअंती त्यांनी दर कमी करून ३१ % जास्त दराने काम करण्यास संमती दिली आहे.

करीता श्री.एम.एम.इब्राहीम यांची दराचे वाटाघाटीनुसार ३३.२१ % जास्त ऐवजी ३१% जास्त दराची निविदा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :- हा विषय स्थायी समितीकडे वर्ग करण्यात येतो.

**ठराव :-**

प्रस्तुत विषय स्थायी समितीकडे वर्ग करण्यास मंजुरी देण्यात आली.

**विषय क्रमांक ७६६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेनुसार गांधीपुतळा ते सिटीचौक ते भडकलगेट विकास योजना या रस्त्यामध्ये दोन्ही बाजुस नव्याने जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामाचे महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाची सन २०११-२०१२ आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) दुरसुची नुसार रक्कम रूपये ६५,६८,१५९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन त्यास मा.सर्वसाधारण सभा दिनांक २०.०४.२०१२ विषय क्रमांक ७१७ अन्वये मान्यता प्राप्त आहे.

सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची अंदाजपत्रका पेक्षा ३६% जास्त दराची एक निविदा प्राप्त झाली. कंत्राटदारास दर कमी करणेसाठी कळविण्यात आले असता त्यांनी त्यास नकार दिला सदर जलनि:सरण वाहिनीचे काम पावसाळयापुर्वी करणे आवश्यक असल्यामुळे दराचे वाटाघाटीसाठी कंत्राटदार यांना बोलविले असता वाटाघाटीअंती त्यांनी दर कमी करून ३१ % जास्त दराने काम करण्यास संमती दिली आहे.

करीता उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची दराचे वाटाघाटीनुसार ३६ % जास्त ऐवजी ३१% जास्त दराची निविदा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :- हा विषय स्थायी समितीकडे वर्ग करण्यात येतो.

**ठराव :-**

प्रस्तुत विषय स्थायी समितीकडे वर्ग करण्यास मंजुरी देण्यात आली.

**विषय क्रमांक ७६७ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेनुसार नेहरू भवन ते औरंगपुरा भाजी मंडई या रस्त्यामध्ये दोन्ही बाजुस नव्याने जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामाचे महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाची सन २०११-२०१२ आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) दुरसुची नुसार रक्कम रूपये ३०,७६,१६०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन त्यास मा.सर्वसाधारण सभा दिनांक २०.०४.२०१२ विषय क्रमांक ७१९ अन्वये मान्यता प्राप्त आहे.

सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत श्री.कदीर शे.रहीम यांची अंदाजपत्रका पेक्षा ४९%जास्त दराची एक निविदा प्राप्त झाली..सदर जलनि:सरण वाहिनीचे काम पावसाळयापुर्वी करणे आवश्यक असल्यामुळे दराचे वाटाघाटीसाठी कंत्राटदार यांना बोलविले असता वाटाघाटीअंती त्यांनी दर कमी करून ३१ % जास्त दराने काम करण्यास संमती दिली आहे.

करीता श्री.अ.कदीर शे.रहीम यांची दराचे वाटाघाटीनुसार ४९ % जास्त ऐवजी ३१% जास्त दराची निविदा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :- हा विषय स्थायी समितीकडे वर्ग करण्यात येतो.

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तुत विषय स्थायी समितीकडे वर्ग करण्यास मंजुरी देण्यात आली.

**<u>विषय क्रमांक ७६८ :-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील विकास आराखड्यानुसार रस्ता रूंदीकरणाचे काम महानगरपालिकेने हाती घेतलेले असून त्यानुसार वार्ड-अ कार्यक्षेत्रातील विकास योजनेनुसार रस्ता रूंदीकरण मोहीमेअंतर्गत विविध रस्त्यावरील बाधीत असलेल्या, पाडण्यात / हटविण्यात आलेल्या इमारतीचा मलबा उचलणे आवश्यक असल्याने व महानगरपालिकेकडे स्वत:चे वाहने तेवढ्या प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे कार्यालयीन दर पत्रक सुचना क्रं./मनपा/यांत्रिकी/शअ/६६०/२०११, दिनांक १७/०७/२०११ अन्वये खालील प्रमाणे दरपत्रके मागविण्यात आली होती. त्या मध्ये

| अ.क्र. | वापरण्यात आलेले यंत्र सामुग्री | प्रती तास | प्रती दिन |
|---|---|---|---|
| ०१ | जे.सी.बी. मशीन | १०५०/- | -- |
| ०२ | पोकलेन मशीन | २०००/- | -- |
| ०३ | पोकलेन मशीन शिफटींग चार्जेस | ८५००/- | -- |
| ०४ | मोठे टिप्पर | -- | ७०००/- |
| ०५ | छोटे टिप्पर | -- | ३१५०/- |

दर पत्रके मागवून त्यास खालील प्रमाणे आयुक्त यांनी मंजुरी दिली असुन दिनांक २३.०२.२०१२चे ज्ञापनाद्वारे रस्त्यावरील मलबा/मटेरिअल रात्र दिवस २४ तास उचलण्याचे काम करून घेण्याचे आदेश दिले आहेत.

सदर मंजुर दरानुसार दिनांक ०८/०२/२०१२ पासुन न्यु साधना इंजिनिअरींग वकर्स श्री. प्रभाकर मोहीते आणि श्री. नसीम पटेल यांच्या कडून खालील रस्त्यातील मलबा, व्यर्थ साहित्य इ. उचलण्याचे आणि त्याची योग्य ठिकाणी विल्हेवाट लावण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय ते चेलीपुरा चौक ते शाहगंज चमन विकास योजना रस्ता.

- महात्मा गांधी पुतळा शाहगंज ते सिटीचौक ते भडकलगेट विकास योजना रस्ता.
- मनपा मुख्य कार्यालय टाऊन हॉल ते लोटाकारंजा ते चेलीपुरा चौक विकास योजना रस्ता.
- नेहरूभवन ते औरंगपुरा भाजी मंडई विकास योजना रस्ता.
- मकाईगेट ते विद्यापीठ विकास योजना रस्ता.
- पानदरीबा ते सराफा विकास योजना रस्ता.
- महात्मा गांधी पुतळा शाहगंज ते मंजुरपुरा चौक विकास योजना रस्ता. वरील प्रमाणे रस्त्यावरील मलबा उचलण्यासाठी लावण्यात आलेल्या यंत्रसामुग्रीचे विवरण खालील प्रमाण आहे.

अ) कंत्राटदाराचे नांव : न्यु साधना इंजिनिअरींग वर्क्स.

| अ.क्र. | मशीनचा प्रकार | संख्या | दर | प्रति दिवस | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | टिप्पर (मोठे) | १३५ | ७०००/- | प्रती दिवस | ९४५०००/- |
| ०२ | टिप्पर (छोंटे) | १०५ | ३१५०/- | प्रती दिवस | ३३०७५०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०३ | जेसीबी मशीन | ७२ | १०५०/- | प्रती तास | ७५६००/- |
| ०४ | पोकलेन मशीन<br>०२ मशीन) | ४३२ | २०००/- | प्रती तास | ८६४०००/- |
| ०५ | पोकलेन शिफ्टींग | ३ | ८५००/- | प्रती जॉब | २५५००/- |
| | | | | एकूण रक्कम रू | २२,४०,८५०/- |

ब) कंत्राटदाराचे नांव : श्री प्रभाकर मोहीते.

| अ.क्र. | मशीनचा प्रकार | संख्या | दर | प्रति दिवस | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | टिप्पर (मोठे) | २२ | ७०००/- | प्रती दिवस | १५४०००/- |
| ०३ | जेसीबी मशीन | १८ | १०५०/- | प्रती तास | १८९००/- |
| | | | | एकूण रक्कम रू | १,७२,९००/- |

क) कंत्राटदाराचे नांव : श्री नसीम पटेल

| अ.क्र. | मशीनचा प्रकार | संख्या | दर | प्रति दिवस | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | टिप्पर (मोठे) | १८ | ७०००/- | प्रती दिवस | १२६०००/- |
| | | | | एकूण रक्कम रू | १,२६,०००/- |

दिनांक ०८/०२/२०१२ ते दिनांक १५/०३/२०१२ पर्यंत झालेल्या कामाचा खर्च रक्कम रू. २५,३९,७५०/- झाले आहे तसेच सध्या देखील रस्त्यावरील मलबा उचलण्याचे काम प्रगतीपथावर असून त्यास अपेक्षीत रक्क्म रू. १०.०० लक्ष अशी एकुण रक्क्म रू.३५,३९,७५०/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :- हा विषय स्थायी समितीकडे वर्ग करण्यात येतो.

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तुत विषय स्थायी समितीकडे वर्ग करण्यास मंजुरी देण्यात आली.

**<u>विषय क्रमांक : ७६९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बल्गेरिया येथे होणा-या अंतरराष्ट्रीय जिम्नॅस्टिक स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झालेला औरंगाबाद शहरातील युवा खेळाडू श्री.आनंद दामोधर थोरात याची आर्थिक परिस्थिती फारच नाजुक असल्यामुळे यास्पर्धेत सहभागी होण्यासाठी त्याला आर्थीक मदतीची गरज आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी त्याला एकूण रक्कम रू.७७,०००/- (सत्याहत्तर हजार रूपये) इतका खर्च येणार असल्याने औरंगाबाद डिस्ट्रीक जिम्नॅस्टिक असोशिएनने स्पष्ट नमूद केले आहे.

औरंगाबाद शहरातील खेळाडू अंतरराष्ट्रीय स्पर्धेत प्रतिनिधीत्व करतो ही शहरवासियासाठी अभिमानाची बाब आहे. मा. सर्व साधारण सभेत दि.०९/०५/२०१२ रोजी विषय क्र.७४५ नुसार श्री.विवेक सुधीर देशपांडे यांना यास्पर्धेत भाग घेण्यासाठी रक्कम रू.७७,०००/- (सत्याहत्तर हजार रूपये फक्त ) मंजुर केले आहे. श्री.आनंद दामोदर थोरात हा खेळाडूही बल्गे्रिया येथे होणा-या अंतरराष्ट्रीय जिम्नॅस्टिक स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झालेली आहे. या दोन्ही खेळाडूंना दि.२९/०५/२०१२ रोजी उपरोक्त स्पर्धेसाठी जाणार असल्याने श्री.आंनद थोरात यालाही श्री.विवेक देशपांडे या खेळाडूस मंजुर केल्या निधी प्रमाणेच विशेष बाब म्हणून

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे रक्कम रू. ७७,०००/- (सत्याहत्तर हजार रूपये फक्त) आर्थिक मदत करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.
सुचक : श्री.मिलिंद यशवंतराव दाभाडे, श्री.प्रशांत देसरडा, श्री.डॉ.खान जफर अहमद श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे,श्री.संजय चौधरी.श्री.नारायण कुचे
अनुमोदक : श्रीमती.वाघमारे ज्योती रूपचंद,श्री.अफसर खान ,श्रीमती.सविता भगवान घडमोडे
मा.महापौर :मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बल्गेरिया येथे होणा-या अंतरराष्ट्रीय जिम्नॅस्टिक स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झालेला औरंगाबाद शहरातील युवा खेळाडू श्री.आनंद दामोधर थोरात याची आर्थिक परिस्थिती फारच नाजुक असल्याने व त्यास यास्पर्धेत सहभागी होण्यासाठी खर्च येणार असल्याने त्याला रक्कम रू. ७७,००० (सत्याहत्तर हजार रूपये) इतकी आर्थीक मदत देणेसाठी नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक : ७७०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,श्रीमान विश्वास साळुंके हे फार मोठे लोकशाहीर होते. त्याकरीता एन-७ ते एन-८ कडे जाणा-या रस्त्यावरील चौकाला लोकशाहीर विश्वास साळुंके चौक असे नाव देण्याबाबत मा.सर्वसाधारण सभेत प्रस्ताव ठेवण्यात यावा ही विनंती.
सुचक : श्री.काशीनाथ हरिभाऊ कोकाटे अनुमोदक : श्री.महेश माळवतक

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,एन-७ ते एन-८कडे जाणा-या रस्त्यावरील चौकास लोकशाहीर विश्वास साळुंके चौक असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक : ७७१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.०१ हर्सुल येथील विकास कामासाठी सन २०१२-२०१३ या अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आलेली असुन खालील कामाऐवजी सुधारीत कामासाठी तरतुद ठेवण्यात येवून काम हाती घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|
| अनुक्रमांक १ पान क्र. वार्ड -अ स्पील-१ लेखाशिर्षक वार्ड क्र.०१ अंतर्गत विविध ठिकाणी पुर्नडांबरीकरण करणे रक्कम रू.१५.०० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेले आहे. | १.वार्ड क्र.०१ हर्सुल अंतर्गत विविध ठिकाणी रस्ते कॉक्रीटीकरण करणे रक्कम रू.१५.०० लक्ष |

सुचक :श्री.बन्सी ग्यानु जाधव अनुमोदक : श्री. विरभद्र गादगे

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.०१ हर्सुल येथील विकास कामासाठी २०१२-२०१३ या अर्थसंकल्पात ठेवण्यात आलेली तरतुद खालील सुधारीत कामासाठी वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.

| प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|
| अनुक्रमांक १ पान क्र. वार्ड -अ स्पील-१ | १.वार्ड क्र.०१ हर्सुल अंतर्गत विविध ठिकाणी |

| | |
|---|---|
| लेखाशिर्षक वार्ड क्र.०१ अंतर्गत विविध ठिकाणी पुर्नडांबरीकरण करणे रक्कम रू.१५.०० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेले आहे. | रस्ते कॉक्रीटीकरण करणे रक्कम रू.१५.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक : ७७२:-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.८४ मधील मानकनगर व कल्पतरू हॉसिंग सोसायटी मध्ये महानगरपलिकेच्या रेखांकनातील खुली जागा विकसीत करण्यात आलेली आहे. या खुल्या जागेस संत सावता माळी उद्यान असे नाव देण्यात यावे.या करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी सादर.

सुचकः श्री.पंकज रामचंद्र भारसाखळे अनुमोदक : श्री.बबन पंडितराव नरवडे
श्री.कृष्णा सांडुजी बनकर,श्री.व्ही.एम.जाधव

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.८४ मधील मानकनगर व कल्पतरू हॉसिंग सोसायटी मध्ये महानगरपलिकेच्या रेखांकनातील खुल्या जागेस संत सावता माळी उद्यान असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक : ७७३:-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.८४ मधिल आदर्श कॉलनी मध्ये महानगपालिकेच्या रेखांकनातील खुली जागा विकसीत करण्यात आलेली आहे. या खुल्या जागेस राजमाता जिजाऊ उद्यान असे नाव देण्यात यावे. या करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी सादर.

सुचक : श्री.पंकज रामचंद्र भारसाखळे. अनुमोदक : श्री.बबन पंडितराव नरवडे ,
श्री.कृष्णा सांडुजी बनकर,श्री.व्ही.एम.जाधव

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.८४ मधिल आदर्श कॉलनी मध्ये महानगपालिकेच्या रेखांकनातील खुल्या जागेस राजमाता जिजाऊ उद्यान असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक : ७७४:-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.८४ मधिल नाथ प्रांगण मधील इमरॉल्ड सिटीच्या मागील महानगरपालिकेच्या रेखांकनातील खुली जागा विकसीत करण्यात आलेली आहे.या खुल्या जागेस प.पू.माधव सदाशिव गोळवळकर श्री.गुरूजी उद्यान असे नाव देण्यात यावे.या करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी सादर.

सुचकः श्री.पंकज रामचंद्र भारसाखळे अनुमोदक : श्री.बबन पंडितराव नरवडे,
श्री.कृष्णा सांडुजी बनकर,श्री.व्ही.एम.जाधव

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.८४ मधिल नाथ प्रांगण मधील इमरॉल्ड सिटीच्या मागील महानगरपालिकेच्या रेखांकनातील खुल्या जागेस प.पू.माधव सदाशिव गोळवळकर श्री.गुरूजी उद्यान असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक : ७७५:-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.८४ येथिल सहास हॉसिंग सोसायटी व आर.बी.हिल्स,नाथप्रांगण मध्ये महानगरपालिकेच्या रेखांकनातील खुली जागा विकसीत करण्यात आलेली आहे.या खुल्या जागेस स्वातंत्रविर विनायक दामोधर सावरकर उद्यान असे नाव देण्यात यावे.या करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी सादर.

सुचकःश्री.पंकज रामचंद्र भारसाखळे    अनुमोदक :श्री.बबन पंडितराव नरवडे,
श्री.कृष्णा सांडुजी बनकर,श्री.व्ही.एम.जाधव

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.८४ येथिल सहास हॉसिंग सोसायटी व आर. बी. हिल्स,नाथप्रांगण मध्ये महानगरपालिकेच्या रेखांकनातील खुल्या जागेस स्वातंत्रविर विनायक दामोधर सावरकर उद्यान असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक : ७७६:-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्रमांक ५५ मधील विकास कामासाठी सन २०१०-११ या अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आलेली आहे. खालील कामाऐवजी सुधारित कामासाठी तरतुद ठेवण्यात येवुन काम हाती घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| प्रस्तावित विकास काम | सुधारित विकास काम |
|---|---|
| लेखाशिर्षकः मा.सर्वसाधारण सभेने सन २०१०-११ अर्थसंकल्पात सुचविलेले काम जीबीआर वार्ड C पेज नं.६ अ.क्र.२४<br>१) वार्ड क्रमांक ५५ अंतर्गत विविध ठिकाणी विविध गल्ल्यामध्ये पेव्हरब्लॉक बसविणे मिनारा मस्जिद ते समी कॉलनी | १) वार्ड क्रमांक ५५ येथे विविध गल्ल्यामध्ये सिमेंट कॉंक्रेट रस्ता करणे. |
| २) जीबीआर वार्ड C पेज ने.१० अ.क्र.११<br>वार्ड क्रमांक ५५ कैसर कॉलनी अंतर्गत जलवाहिनी टाकणे वळती नागसेन कॉलनी येथील अल्ताफ यांचे घर ते हयाजा मस्जीद पर्यंत इटालियन गट्टु बसविणे | २) वार्ड क्रमांक ५५ येथे नागसेन कॉलनी ते शेर खा कॉलनी पर्यंत सिमेंट कॉंक्रेट करणे |

सुचकः- श्री.शहानवाज खॉन,    अनुमोदक :-डॉ.खान जफर अहेमद

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्रमांक ५५ मधील विकास कामासाठी सन २०१०-११ या अर्थसंकल्पात प्रस्तावित विकास कामासाठी ठेवण्यात आलेली तरतुद खालील सुधारित कामासाठी वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.

| प्रस्तावित विकास काम | सुधारित विकास काम |
|---|---|
| लेखाशिर्षकः मा.सर्वसाधारण सभेने सन २०१०-११ अर्थसंकल्पात सुचविलेले काम | १) वार्ड क्रमांक ५५ येथे विविध गल्ल्यामध्ये सिमेंट कॉंक्रेट रस्ता |

| | |
|---|---|
| जीबीआर वार्ड C पेज नं.६ अ.क्र.२४ १) वार्ड क्रमांक ५५ अंतर्गत विविध ठिकाणी विविध गल्ल्यामध्ये पेव्हरब्लॉक बसविणे मिनारा मस्जिद ते समी कॉलनी. | करणे. |
| २) जीबीआर वार्ड C पेज ने.१० अ.क्र.११ वार्ड क्रमांक ५५ कैसर कॉलनी अंतर्गत जलवाहिनी टाकणे वळती नागसेन कॉलनी येथील अल्ताफ यांचे घर ते हयाजा मस्जीद पर्यंत इटालियन गट्टु बसविणे | २) वार्ड क्रमांक ५५ येथे नागसेन कॉलनी ते शेर खा कॉलनी पर्यंत सिमेंट कॉंक्रेट करणे |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७७७:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्रं. ३५ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधासाठी बदलण्यांत यावा हि विनंती.

| पान क्रं व अ.क्र | २०११-२०१२ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे |
|---|---|---|
| वार्ड अ न्यु वर्क -२ | वार्ड क्रं. ३५ येथे आरोग्य केंद्र दुरुस्त करणे आर्थीक तरतुद ०५ लक्ष | १. वार्ड क्रं.३५ मधील कोतवालपुरा भागात विविध ठिकाणी पथदिवे बसविणे |

सुचक :श्री.विजेंद्र मुरलीधर जाधव अनुमोदक :डॉ खान जफर अहेमद, श्री.शेख अब्दुल असद

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्रं.३५ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्रं व अ.क्र | २०११-२०१२ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे |
|---|---|---|
| वार्ड अ न्यु वर्क -२ | वार्ड क्रं. ३५ येथे आरोग्य केंद्र दुरुस्त करणे.आर्थीक तरतुद ०५ लक्ष | १. वार्ड क्रं.३५ मधील कोतवालपुरा भागात विविध ठिकाणी पथदिवे बसविणे |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७७८:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.१६ मध्ये विकास कामासाठी सन २०१२-२०१३ या अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आलेली असुन खालील कामाऐवजी सुधारीत कामासाठी तरतुद वळती करुन काम हाती घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| **प्रस्तावित विकास काम** | **सुधारीत विकास काम** |
|---|---|
| लेखाशिर्षक वार्ड क्र.१६ आरक्षित जागेवर उद्यान विकसीत करणेसाठी अर्थसंकल्प सन २०१२-२०१३ मध्ये नविन कामे पा.क्र.९७ अ.क्र.७ वर १२.५० लक्ष इतकी तरतुद आहे. त्यामधुन रक्कम रु. ४.५० लक्ष | वार्ड क्र.१६ मधील विविध ठिकाणी खेळणी व बेंचेस बसवुन खुली जागा विकसीत करणे. ४.५० लक्ष. |

| | |
|---|---|
| शिल्लक असुन सदरील रक्कम सुधारीत कामासाठी वळती करण्यात यावी. | |

सुचक :श्री.किशोर बाबुराव नागरे

अनुमोदक : सौ.प्राजक्ता मंगेश भाले, श्री.विरभद्र गादगे, श्री.अनिल जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१६ मध्ये विकास कामासाठी सन २०१२-२०१३ या अर्थसंकल्पात प्रस्तावीत विकास कामासाठी ठेवण्यात आलेली तरतुद खालील सुधारीत कामासाठी वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.

| प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|
| लेखाशिर्षक वार्ड क्र.१६ आरक्षित जागेवर उद्यान विकसीत करणेसाठी अर्थसंकल्प सन २०१२-२०१३ मध्ये नविन कामे पा.क्र.९७ अ.क्र.७ वर १२.५० लक्ष इतकी तरतुद आहे. त्यामधुन रक्कम रु. ४.५० लक्ष शिल्लक असुन सदरील रक्कम सुधारीत कामासाठी वळती करण्यात यावी. | वार्ड क्र.१६ मधील विविध ठिकाणी खेळणी व बेंचेस बसवुन खुली जागा विकसीत करणे. ४.५० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७७९:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहरामधील बहुतांश नागरिकांची शहरामध्ये अद्यावत फीश मार्केट नसल्याने नागरीकांची सुविधा म्हणून अद्यावत फीश मार्केट महानगरपालिकेने बांधावे अशी मागणी आहे. शहरामध्ये सध्या उघडयावर फीश मार्केट भरते. हे फीश मार्केट पूर्णपणे आरोग्यास धोकादायक असुन ते उघडयावर भरल्यामुळे काही नागरीकांचा त्यास विरोध देखील आहे. या सर्व बाबी करीता नागरिकांची मागणी विचारात घेता महानगरपालिकेतर्फे अद्यावत सुविधासह फीश मार्केट बांधण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. हे मार्केट महानगरपालिकेच्या बायजीपूरा जकात नाका येथील प्रस्तावित मनपा निवासस्थान क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे. मात्र या ठिकाणी नागरीकांचा विशेषत: स्थानिक लोकप्रतिनिधी यांचा त्यास (जागेबाबत) विरोध आहे. ही बाब लक्षात घेता आणि नागरिकांचे आरोग्यासाठी सर्व सोयीयुक्त फीश मार्केट बांधणे बाबत महानगरपालिकेची तयारी असल्याने हे मार्केट या जागेच्या लगतच असलेल्या महानगरपालिकेच्या बायजीपुरा येथील मेकॅनिकल वर्कशॉप या जागेमध्ये बांधण्यात यावे. सदर जागा मेकॅनिकल वर्कशॉप करीता विकास योजना मध्ये दाखविण्यात आली आहे. परंतू नागरिकांची मागणी, कामाची आवश्यकता विचारात घेता या जागेवरच शासनाने मंजूरीस अधीन राहून फीश मार्केट बांधण्यात यावे. उर्वरीत जागेवर विकास योजनेनुसार मेकॅनिकल वर्कशॉप कायम ठेवावे.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मो.मुजीबोद्दीन मो.कदिरोद्दीन अनुमोदक : डॉ.खान जफर अहेमद, श्री.असद पटेल

श्री.रेणुकादास वैद्य :संबधीत जे लोक आहे त्यांचे सोबत मा.आयुक्त यांनी बैठक घेउुन हा विषय त्यांचे अधिकारात मार्गी लावावा.

मा.महापौर :या विषया संबधीत सर्वांशी चर्चा करून प्रशासनाने योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

डॉ.जफर खान : दुरुस्तीसह मंजुर करावे.

**<u>ठराव</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद शहरात अद्यावत फीश मार्केट महानगरपालिकेतर्फे बांधण्याचे काम महानगरपालिकेच्या बायजीपूरा जकात नाका येथील प्रस्तावित मनपा निवासस्थान क्षेत्रामध्ये करण्यासाठी संबधीत जे लोक आहे त्यांचेशी प्रशासनाने चर्चा करून योग्य निर्णय घेण्याबाबत वैधानिक कार्यवाही करावी.

**<u>विषय क्रमांक ७८०:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, राज्यातील क्रीडा क्षेत्राचा विकास होण्यासाठी केंद्र व राज्यशासनाच्या वतीने अनेक क्रीडा धोरणे राबविण्यात येतात.शहरात क्रिडा संस्कृती रूजविण्यात महानगरपालिकेचे योगदान महत्वाचे ठरावे यासाठी शासनाच्या वतीने अनेक निर्देश राज्यातील महानगरपालिकेसाठी काढण्यात आले आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने त्यांचा शासन निर्णय,समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो/१०९६ प्र.क्र.३३०/क्रीयुसे/१ अन्वये महानगरपालिकेच्या हद्दीत येणा-या महानगरपालिकेच्या शाळा व खाजगी शाळांच्या आंतरशालेय स्पर्धेचे आयोजन माहनगरपालिकांनी क्रीडा समिती स्थापन करून करावे,असे निर्देश दि.१२ नोव्हेंबर १९९७ च्या शासन निर्णय नुसार काढले आहे.तसेच या शासन निर्णयामध्ये अंशत:बदल करून संचालक,क्रीडा व युवक सेवा,पुणे यांनी दि.२६/०९/२००३ रोजी (क्रमांकजिविरा/किस्प/सहभाग/मनपा/२००३-२००४/का.४) शुध्दीपत्रकही काढले आहे.परंतु या शासन निर्णयाच्या अंमलबजावणी आपल्या महानगरपालिकेत आद्यापही झालेली नाही.

या दोन्ही शासन निर्णयाची अंमलबजावणी आपल्या शहराच्या क्रीडा क्षेत्राच्या विकासाठी तात्काळ होणे अत्यंत गरजेचे आहे.तसेच शहरात क्रीडा संस्कृती रूजावी या हेतूने या शासन निर्णयाची अंमलबजावणी औरंगाबाद महानगरपालिकेत करून औरंगाबाद महानगरपालिकेची क्रीडा समिती स्थापन करावी ,करिता प्रस्ताव मंजुरीसाठी सादर.

सुचक : श्री. पंकज रामचंद्र भारसाखळे,

अनुमोदक : श्री.संजय केनेकर, श्री.राजु शिंदे श्री.संजय चौधरी, श्री.बबन नरवडे

**<u>ठराव</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरात क्रीडा संस्कृती रूजावी या हेतूने या शासन निर्णयाची अंमलबजावणी औरंगाबाद महानगरपालिकेत करून औरंगाबाद महानगरपालिकेची क्रीडा समिती स्थापन करण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७८१:</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुत्र यशवंतराव ऊर्फ भैय्यासाहेब आंबेडकर यांनी बाबासाहेबांच्या चळवळींना बळकटी देण्याचे आणि प्रकाशझोतात आणण्याचे काम केले.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या शेडयुल्ड कास्ट फेडरेशन ,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, पीपल्स एज्युकेशन सोसायटी,दि.बुध्दिष्ट सोसायटी ऑफ इंडिया (भारतीय बौध्द महासभा ) अशा अनेक सामाजिक, राजकीय व शैक्षणिक संस्थेने कार्य भैय्यासाहेबांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनंतर यशस्वीरित्या पुढे नेले. मराठवाडयाच्या लोकासांठी शिक्षणाचे दरवाजे उघडणा-या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या मिलींद कॉले्जचा विस्तार त्यांच्या कार्यकाळात मोठयाप्रमाणात झाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ लॉ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड आर्टस हि महाविद्यालये नागसेनवन परिसरात त्यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात सुरु झाले.

भैय्यासाहेब आंबेडकरांच्या कार्याचे स्मरण होण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व पानचक्की जवळ असलेल्या नागसेनवन परिसरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ लॉ समोरील महानगरपालिकेच्या बेटातील चौकाला सुर्यपुत्र यशवंतराव ऊर्फ भैय्यासाहेब आंबेडकर असे नाव देण्यात यावे तसेच याठिकाणी भैय्यासाहेब आंबेडकरांचा पुर्ण आकृती पुतळा बसविण्यात यावा, करिता हा प्रस्ताव सर्वसाधारण सभे पुढे मंजुरीस सादर.

सुचक : श्री. पंकज रामचंद्र भारसाखळे

अनुमोदक : श्री.संजय केनेकर, श्री.राजु शिंदे श्री.संजय चौधरी श्री.बबन नरवडे

श्री.रेणुकादास वैद्य :पुतळा समितीकडे पाठवावे त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर करुन पुतळा समितीकडे पाठविण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भैय्यासाहेब आंबेडकरांच्या कार्याचे स्मरण होण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व पानचक्की जवळ असलेल्या नागसेनवन परिसरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ लॉ समोरील महानगरपालिकेच्या बेटातील चौकाला सुर्यपुत्र यशवंतराव ऊर्फ भैय्यासाहेब आंबेडकर असे नाव देण्यास तसेच याठिकाणी भैय्यासाहेब आंबेडकरांचा पुर्ण आकृती पुतळा बसविण्यास व याबाबत प्रस्ताव पुतळा समितीकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद

## औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

### कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (४३)

### दिनांक २०.०६.२०१२ (दि.३०.०५.२०१२ ची पुढे ढकललेली) रोजी आयोजीत सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे.

**स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमुद खान :**

**प्रश्न क्र.११७:**

**उत्तर: (सहाय्यक संचालक नगर रचना)**

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| १.शहागंज भाजीमंडई कोणाच्या मालकीची आहे? | सदर जागा मनपाच्या मालकीची आहे. सदर जागेचे न.भु.मा.क्र. १०२६८,१०२३४,१०२७२ असे असून पी.आर.कार्डला मालकी हक्कात महानगरपालिकेची नोंद आहे. |
| २.लीज काळ (जागेचा ) पूर्ण झालेला आहे का ? | सदर जागेची मालकी हक्काची नोंद पीआर कार्डमध्ये मनपाच्या नावाने आहे. |
| ३.शहागंज भाजी मंडईचा विकास आराखडा तयार झालेला आहे का?त्याची कॉपी देण्यात यावी. | याबाबतची कार्यवाही मा.शहर अभियंता विभागाकडून करण्यात येत आहे. |

स.स.श्री.अशोक किसनराव बेहडे :

**प्रश्न क्र.११८ :**

**उत्तर: (सहाय्यक संचालक नगर रचना)**

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| औरंगाबाद म.न.पा. हद्दीमध्ये जानेवारी २०१२ ते आतापर्यंत किती लोकांना T.D.R. देण्यात आला त्याची रूपरेषा काय आहे? याची संपूर्ण माहिती देण्यात यावी. | जानेवारी २०१२ ते आजपर्यंत (दिनांक २९.०५.२०१२) पर्यंत २५ मिळकत धारकांना टि.डी.आर देण्यांत आलेला आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नूसार विकास योजना प्रस्तावाने बाधीत क्षेत्रासाठी टि.डी.आर. स्वरुपात मोबदला देण्याची तरतुद असून औरंगाबाद महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीत अशी तरतुद शासनाने मंजुर केलेली आहे. त्या अनुषंगाने टि.डी.आर स्वरुपात मोबदला दिला जातो. |

स.स.श्री.अशोक किसनराव बेहडे :

**प्रश्न क्र.११९ :**

**उत्तर: (सहाय्यक संचालक नगर रचना)**

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| १.रेमण्ड शोरूम जालना रोड बांधकाम परवानगी नुसार अटी शर्ती नुसार जागा मालकाने म.न.पा.ला दिलेली जागा ताब्यात घेतली आहे का ? | महानगरपालिकेच्या ताब्यात दिलेली नाही. या संबंधी प्रशासकीय अधिकार व मालमत्ता अधिकारी मनपा यांना पत्र क्र. ८७९/२०११ दि.२०/४/२०१२ यांना पत्र दिले आहे. |
| एकुण किती जागा आहे | २५% क्षेत्र ५६.०० चौ.मी. आहे, पार्किंगचे क्षेत्र २३.२१ चौ.मी. |
| त्याचा उपयोग कश्या पध्दती ने करण्यात येत आहे ? | वरील १ प्रमाणे |

स.स.श्री.अशोक किसनराव बेहडे :
**प्रश्न क्र.१२०** :
**उत्तर: (सहाय्यक संचालक नगर रचना)**

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| गारखेडा परिसरात म.न.पा ने ७० % मालक व ३० % टक्के जागा म.न.पा ची अटी शर्ती वर बांधकाम परवानगी देण्यात आली आहे.जमीन मालक ३० % टक्के कोणती म.न.पा ला देणार आहे. त्याची संपुर्ण माहिती नकाशा सह देण्यात यावी. | अलिकडील काळात मौजे गारखेडा परिसरात मनपाने ७०%, ३०% प्रमाणे बांधकाम परवानगी देण्यांत आलेली नाही. तथापी मौजे गारखेडा परिसरात न.भू.क्र. १५३०६/१, १५३०७/पैकी मो. अशफाक मोतीवाला पिता मो. सिद्दीक मोतीवाला मुख्यत्यारआम मेसर्स तापडीया ॲण्ड कासलीवाल असो. तर्फे जुगलकिशोर तापडिया व संजय कासलीवाल यांना समावेशक आरक्षण पध्दतीवर ७५, २५% प्रमाणे परवाना क्रमांक ५२६/२००७-०८ दिनांक ०९/१०/२००७ अन्वये बांधकाम परवानगी नुसार २५% क्षेत्र २४३०.२८ चौ.मी. चे बांधकाम महानगरपालिकेस मिळणार आहे. सुलभ संदर्भा करीता मंजुर परवानगी नकाशा सोबत जोडण्यात आलेला आहे. कृपया अवलोकन व्हावे. |

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद